**महाराष्ट्र शासन**

क्र.: अशैस-२०११/प्र.क्र.१२४/का-५
**अल्पसंख्याक विकास विभाग, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,**
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : १६ जुलै, २०११.

प्रति,
**अध्यक्ष / सचिव,**
**श्रीमती कान्ती लल्लन तिवारी एज्युकेशन सोसायटी तथा श्रीमती. के. एल.टी. एज्युकेशन सोसायटी,**
जी-५, राहुल ड्रिम बी टॉवर, राहुल पार्क,
भाईंदर (पुर्व) जि.ठाणे- ४०१ १०५.

विषय :- **भाषिक अल्पसंख्यांक दर्जाची मान्यता मिळणेबाबत....**

संदर्भ :- १.शासन निर्णय अल्पसंख्यांक विकास विभाग, क्र.अशैस-२००८/ प्र.क्र.१३३/२००८/का-५, दि. ४ जुलै २००८
२.शासन शुध्दीपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग, क्र.अविवि-२०११/प्र.क्र.२५/११/कार्या.५, दि.१८ जून, २०११.

महोदय,

कृपया वरील विषयाबाबत आपल्या दि.६/०७/२००९ च्या विनंतीस अनुसरुन मला आपणास असे कळविण्याचे निर्देश आहेत की, शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एस.एम.सी-१००४/(१०४/२००४)/असंक, दि.४ नोंव्हेंबर,२००४ अंन्वये आपल्या **श्रीमती कान्ती लल्लन तिवारी एज्युकेशन सोसायटी, भायंदर (पूर्व), जि.ठाणे, तथा श्रीमती के.एल.टी.एज्युकेशन सोसायटी, भाईंदर (पुर्व) जि.ठाणे- ४०१ १०५** या संस्थेला **हिन्दी भाषिक** अल्पसंख्यांक म्हणून विहित अटींच्या अधिन राहून मान्यता देण्यात आली असल्याचे अभिलेखावरुन दिसून येत आहे.

२. यासंदर्भातील शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, दि. ४ जुलै २००८ मधील परिच्छेद (२), १) अनुसार "ज्या शैक्षणिक संस्थांना दि.११ जुन २००७ पुर्वी विशिष्ट आदेश अथवा सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.असंस/२००६/६३४/प्र.क्र.६३/२००६, दि.११ जुन २००७ अंन्वये अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्था म्हणून मान्यता प्रदान करण्यात आली आहे, अशा शैक्षणिक संस्थांनी अल्पसंख्यांक दर्जाच्या मान्यतेसाठी पुन्हा अर्ज सादर करावयाची आवश्यकता नाही. तथापि, प्रस्तुत शासन निर्णयातील परिच्छेद ५ मध्ये विहित केलेल्या अटी अशा सर्व संस्थांना लागु राहतील" अशी तरतूद विहीत आहे.

३. सदर तरतूद पाहता, **श्रीमती कान्ती लल्लन तिवारी एज्युकेशन सोसायटी, भायंदर (पूर्व), जि.ठाणे,/श्रीमती के.एल.टी.एज्युकेशन सोसायटी, भाईंदर (पुर्व) जि.ठाणे- ४०१ १०५** या संस्थेला **हिन्दी भाषिक** अल्पसंख्यांक दर्जाच्या मान्यतेसाठी पुन्हा अर्ज सादर करावयाची आवश्यकता नाही. तथापि, प्रस्तुत शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, दि.४ जुलै २००८ मधील परिच्छेद ५ मध्ये विहित केलेल्या अटी संस्थेला लागू राहतील.

आपली,

(गीता चांदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.